पोलीस उप आयुक्त परिमंडळ २ वसई कार्यालय
मिरा-भाईदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय.
कार्यालयाचा पत्ता- वसई रेल्वे स्टेशन जवळ, वर्तक कॉलेज समोर, वसई पश्चिम ता. वसई जि. पालघर ४०१२०२ फोन नं.०२५०-२३३२६१४
Email ID- dcp.zone2.mb-vv@mahapolice.gov.in


१६.०४.२०२१

## प्रेस नोट

---

## पोलीस उप आयुक्त परिमंडळ २ वसई कार्यालयामध्ये 'ई भेट' सुविधा कार्यन्वित केलेबाबत.

---

कोव्हीड-१९ या विषाणुमुळे आपल्यासमोर मोठे आव्हान उभे केले असुन पोलीस विभाग हा या महामारीच्या विरुध्द उपाययोजना राबविण्यामधील एक महत्वाची अग्रभागी संस्था आहे. कोव्हीड-१९ उपाययोजनांचा भाग म्हणुन शासनाने अनावश्यकपणे फिरणाऱ्या लोकांकरीता संचारबंदी लागु केलेली असुन सरकारी कार्यालयातील प्रत्यक्ष भेटीस मनाई केलेली आहे. अशा परिस्थितीमध्ये नागरिकांना तसेच पोलीस अधिकारी व अंमलदार यांच्या तक्रारी वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत पोहचविण्याकरीता एक माध्यम उपलब्ध करणे गरजेचे आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने कोव्हीड-१९ या प्रादुर्भावाच्या अनुषंगाने 'ब्रेक द चेन' अन्वये निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचनांमध्ये देखील अशाप्रकारचे माध्यम सुरु करण्याबाबत सुचना दिलेल्या आहेत. तसेच मा.पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय यांचेकडील क्र. पो.आ.मि.भा.व.वि./ई भेट/१४८/२०२१, दि.१६.०४.२०२१ अन्वये देखील सुचना देण्यात आलेल्या आहेत.

त्याअनुषंगाने तक्रारदार यांनी पोलीस उप आयुक्त परिमंडळ २ वसई यांचे समक्ष भेटी ऐवजी ऑनलाईन 'ई भेट' द्वारे संवाद साधावा. सदरचा ऑनलाईन संवाद सोमवार ते शुक्रवार या कामकाजाच्या दिवशी दुपारी ०३.०० ते ०५.०० या वेळेत ८६६९६०४००३ या नंबरवरती व्हॉट्सअॅप द्वारे, व्हिडीओ कॉल या द्वारे संवाद साधावा. तसेच तक्रारी संबंधीची कागदपत्रे सादर करावयाची असल्यास ती वर नमुद केलेल्या व्हॉट्सअॅप क्रमांकावर पाठवावीत.

---